# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.११/०५/२०२४

## बाईक रॅलीद्वारे मतदान जनजागृती

मा.जिल्हाधिकारी, पालघर व मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप अॅक्टीविटी (SVEEP ACTIVITY) अंतर्गत दि.१० मे २०२४ रोजी, सकाळी ९.०० वाजता वसई विरार शहर महानगरपालिका, परिवहन मुख्यालय (VVMT Depo), यशवंत नगर, विरार (पश्चिम) येथे मतदानाबाबत जनजागृती करणेसाठी बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीमध्ये महानगरपालिका अग्निशमन विभागाच्या वाहनांचाही समावेश होता.

सदर जनजागृती रॅलीच्या माध्यमातून युवक वर्गाने आणि सर्व मतदारांनी जागरूकतेने आणि जास्तीत जास्त संख्येने मतदान करून लोकशाही बळकट करावी असे आवाहन करण्यात आले. सदर बाईक रॅलीची सुरुवात वसई विरार शहर महानगरपालिका, परिवहन मुख्यालय, विरार (पश्चिम) येथून झाली व त्यानंतर बोळींज नाका, उंबरगोठण, निर्मळ नाका, होळी, झेंडा बाजार, वसई कोर्ट नाका, जी.जी कॉलेज, अंबाडी रोड, वसंत नगरी, मनवेल पाडा रोड या ठिकाणाहून फिरून महानगरपालिका मुख्यालय, विरार (पूर्व) येथे सदर रॅलीची सांगता झाली.

यावेळी मा.अतिरिक्त आयुक्त श्री.रमेश मनाळे, मा.सहा.निवडणूक निर्णय अधिकारी श्री.शेखर घाडगे, महानगरपालिकेचे उप-आयुक्त, सहा.आयुक्त, स्वीप चे कर्मचारी, मनपा अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मतदारांनी जास्त संख्येने मतदान करावे यासाठी जनजागृती सोबतच इतरही उपाययोजना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालय व महानगरपालिका यांचे मार्फत करण्यात आल्या आहेत. सध्या सुरु असलेल्या कडक उन्हाचा त्रास मतदारांना होऊ नये यासाठी मतदार केंद्रांवर मंडप व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वृद्ध व आजारी मतदारांना बसण्याची व्यवस्था, वैद्यकीय व्यवस्था इ.करण्यात आलेल्या आहेत. तसेच मतदान केंद्रांवर पाळणाघराची व्यवस्था, वृद्ध अपंग व्यक्तींसाठी रॅम्पची व्यवस्था इ. अनेक उपाययोजना मतदारांच्या सोयीसाठी करण्यात आल्या आहेत. जेणेकरून मतदारांना मतदान केंद्रांवर कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही. यामुळे जास्तीत जास्त मतदारांनी मतदान केंद्रावर जाऊन मतदान करून लोकशाही बळकट करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**